**Reg No: MSCS/CR/1014/2014**

**गजवैभवलक्ष्मी मल्टीस्टेट अॅग्रोपर्पज को-ऑप सोसायटी लि. पुणे**

**मुख्य कार्यालय:प्लॉट नं. १९, माई बंगलो, डॉ. शामाप्रसाद सोसायटी, मोरे बाग, कात्रज, पुणे ४११०४६ महाराष्ट्र**

**१२ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस**

**(केवळ सभासदांसाठी)**

गजवैभवलक्ष्मी मल्टीस्टेट अॅग्रोपर्पज को-ऑप सोसायटी लि. पुणे या संस्थेची बारावी वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महात्मा फुले विद्या प्रतिष्ठान, सर्व्हे नं ३२/२/१, आंबेगाव (बु),हवेली, पुणे ४११०४६ या ठिकाणी खालील विषयांवर विचार करून निर्णय घेण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

<u>सभे पुढील विषय</u>

१. सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.
२. मागील झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (आर्थिक वर्ष२०२४-२५ आणि २०२५-२६)
३. मा. संचालक मंडळाने तयार केलेला आर्थिक वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ चा वार्षिक अहवाल आणि दि. ३१/०३/२०२५ व दि. ३१/०३/२०२६ चा ताळेबंद, सन २०२४-२५ व सन २०२५-२६ चे नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे व वैधानिक लेखा परीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
४. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे. तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी अंतर्गत लेखा परिक्षकांची नेमणूक करण्याचे व त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.
५. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ कलम ३९(३) नुसार, संस्थेचे संचालक/कार्यकारी संचालक व त्यांच्या नातेवाईकांना वर्ष २०२४-२५ व वर्ष २०२५-२६ मध्ये दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
६. सदर वार्षिक सर्व साधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
७. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ: पुणे
दिनांक: १०/०९/२०२६

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
गुरव मिथुन महादेव
(व्यवस्थापकीय संचालक)

**विशेष सूचना** :

१. गणसंख्ये अभावी सभा सायंकाळी ४.०० वाजता तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्व साधारण सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी सायंकाळी ४.३० वाजता घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचे कामकाज होईल.
२. मान्यवर सभासदांना संस्थेविषयी काही ज्यादा माहिती हवी असल्यास किंवा काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या २३/०९/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी लेखी स्वरुपात संस्थेच्या मुख्य कार्यालयात कामकाजाचे दिवशी सादर कराव्यात.
३. वार्षिक अहवालाची प्रत संस्थेच्या शाखांमध्ये व मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत उपलब्ध राहील.
४. मान्यवर सभासदांचे नाव, राहण्याचा पत्ता व वारसदाराविषयी काही बदल असल्यास त्यांनी तो संस्थेच्या मुख्य कार्यालयास त्वरित कळवावा.